Rotary
Club of Latur Mid-town

UNITE FOR GOOD

## साप्ताहिक

# रोटरी दिशा

## ROTARY CLUB OF LATUR MID-TOWN

ROTARY INTERNATIONAL DISTRICT 3132 | Club No.: 22604

### ऑक्टोबर - २०२५ | आठवा अंक

## विजयादशमी विशेषांक





**Rtn.Francesco Arezzo**
RI President 2025-26



**Rtn.Sudhir Lature**
Dist.Governor 2025-26



**Rtn.Amol Dadge**
President



**Rtn.Pawan Malpani**
Secretary



## Guest Editor Rtn.Dr.Nilesh Itkar



प्रिय रोटेरियन बांधवांनो,

विजयादशमी किंवा दसरा हा सण आपल्या भारतीय संस्कृतीतील एक अतिशय प्रेरणादायी पर्व आहे. सत्याचा असत्यावर, धर्माचा अधर्मावर आणि सद्गुणांचा दुष्ट प्रवृत्तीवर विजय हे या सणाचे मर्म आहे. राम-रावण युद्धात प्रभू श्रीरामांनी विजय मिळवला किंवा महिषासुरावर देवी दुर्गेने विजय मिळवला, या दोन्ही दंतकथांमध्ये एकच संदेश दडलेला आहे  अन्याय, अहंकार, वाईट प्रवृत्ती कितीही सामर्थ्यशाली असले तरी शेवटी विजय हा चांगुलपणाचाच होतो.आजच्या युगातही हा संदेश तितकाच महत्त्वाचा आहे. कारण जीवनात लढाई ही केवळ बाह्य शत्रूंशी नसते, तर आपल्या आतल्या भीती, असुरक्षा, लोभ, मत्सर आणि नकारात्मक विचारांशी देखील असते. विजयादशमी आपल्याला हेच शिकवते की, धैर्य, संयम आणि प्रामाणिकपणाच्या बळावर आपण कोणत्याही आव्हानावर मात करू शकतो.रोटरीचे कार्यदेखील याच तत्त्वाशी पूर्णतः सुसंगत आहे. समाजातील अज्ञान, अशिक्षण, गरिबी, दारिद्र्य, रोगराई, असमानता या दुष्प्रवृत्तीवर विजय मिळवण्यासाठी रोटेरियन सतत कार्यरत असतात. सेवा ही आपली खरी ताकद आहे. जेव्हा आपण एखाद्या गरजूच्या डोळ्यात आशेचा किरण आणतो, शिक्षणाची संधी निर्माण करतो, पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेतो किंवा समाजात स्वास्थ्य आणि सुसंवाद निर्माण करतो, तेव्हा ते आपल्या दृष्टीने विजयादशमीचेच कार्य ठरते.आज विजयादशमीच्या पवित्र दिवशी आपण सर्व रोटेरियननी एक संकल्प करूया  समाजातील प्रत्येक अडथळ्यावर मात करत मानवतेच्या विजयासाठी एकजूट होण्याचा. जसा प्रभू श्रीरामांचा विजय हा केवळ व्यक्तिगत विजय नव्हता, तर संपूर्ण समाजाच्या आनंदाचा उत्सव होता, तसाच आपल्या प्रत्येक प्रकल्पाचा, प्रत्येक सेवाभावी उपक्रमाचा लाभ समाजाच्या कल्याणासाठी व्हावा, हाच आपल्या कार्याचा उद्देश आहे.या विशेषांकातून आपणा सर्वांना एक नवी प्रेरणा मिळेल, याची मला खात्री आहे. रोटरी दिशा हे केवळ एक बुलेटिन नसून, आपल्या विचारांना दिशा देणारे आणि सेवाभाव दृढ करणारे एक व्यासपीठ आहे. अतिथी संपादक म्हणून मला ही संधी दिल्याबद्दल मी रोटरी क्लब ऑफ  लातूर मिडटाऊन व संपादक मंडळाचे मनःपूर्वक आभार मानतो.आपणा सर्वांना विजयादशमीच्या मनःपूर्वक शुभेच्छा! सतत नवा उत्साह, नवी प्रेरणा आणि सेवाभावाची नवी ऊर्जा आपल्या कार्यात ि ळत राहो, हीच प्रार्थना.

रो.निलेश ईटकर<br>
अतिथी संपादक, रोटरी दिशा

## Secretary Report

- मिटींग ची सुरुवात राष्ट्रगीताने झाली
- फोरवे टेस्ट चे सामुहीक वाचन झाले.
- मागील मिटींग चा अहवाल सेक्रेटरी पवन मालपाणी यांनी वाचून दाखवला
- साप्ताहिक पत्रव्यवहार : अध्यक्षांनी सादर केला.
- गेस्ट ॲड. बळवंतराव देशपांडे यांचे स्वागत रो. डॉ. संजय शिवपुजे यांनी केले.
- तसेच रोटरी क्लब ऑफ  सेंट्रल चे माजी अध्यक्ष हेमंत रामढवे, सचिव रो. डॉ. नेताजी शिंगटे व लक्ष्मीकांत गौंड यांचे पेन देऊन स्वागत करण्यात आले.
- क्लब बुलेटिन : सप्टेंबर महिन्याच्या मासिक बुलेटिन चे विमोचन गेस्ट ऐजी रो. ॲड बळवंतराव देशपांडे व अतिथी संपादक डॉ. रो. संजय शिवपुजे झाले.
- अतिथी संपादक डॉ. रो. संजय शिवपुजे यांचे पेन देऊन आभार मानले.
- रोटरी क्लब ऑफ  सेंट्रल चे माजी अध्यक्ष हेमंत रामढवे यांनी डिस्ट्रीक्ट ३१३२ झोन्स ला मधील दृष्टी झोनल समीनार पब्लिक इमेज व युथ सर्विस दि. ५ ऑक्टोबर रोजी भारत फाईन डाईन येथे होणार आहे सर्वांना रजिस्ट्रेशन करण्याचे आवाहन केले
- नेशन बिल्डर अवार्ड- ची माहिती रो. गिरीष पेन्सलवार यांनी दिली.
- गरजु लोकांसाठी जुने कपडे संकलन :  अध्यक्षांनी जुने चांगले कपडे संकलित करून गरिबांना वाटप करणार असल्याचे सांगितले व संकलन केंद्राची माहिती दिली.
- रोटरी रन : रो. संतोष गांधी यांनी रोटरी रन ची माहिती दिली व रोटेरीयन्स व इतर ही सहभागी होऊ शकतात असे सांगितले.
- चित्रकला स्पर्धा चे प्रोजेक्ट चेअरमन अनुपस्थितीत असल्यामुळे अध्यक्षांनी माहिती सांगितली.
- गेस्ट ए. जी. रो. ॲड बळवंतराव देशपांडे यांनी जीवन विकासातील टप्पे या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.
- आभार प्रदर्शन रो. अमोल बनाळे यांनी व्यक्त केले -   फेलोशिप अनाउन्समेंट सचिव पवन मालपाणी यांनी केली.

### Guest of The Week



A.G.Rtn.Balwantrao Deshpande

### Man of The Meeting



Rtn.Dr.Sanjay Shivpuje

### 1st Come in the Hall



Rtn.Kishan Kuleria

विजयादशमी  सत्य, न्याय आणि धैर्याचा उत्सवभारत हा सण-उत्सवांचा देश आहे. प्रत्येक सणामागे एखादी कथा, इतिहास, धार्मिक व सामाजिक संदर्भ दडलेला असतो. त्यातही विजयादशमी किंवा दशहरा हा सण आपल्या संस्कृतीतील सत्याचा असत्यावर, न्यायाचा अन्यायावर आणि सद्गुणांचा दुष्टगुणांवर विजय याचे प्रतीक म्हणून ओळखला जातो. आश्विन शुद्ध दशमीला हा सण साजरा केला जातो.ऐतिहासिक व पौराणिक संदर्भविजयादशमीसंबंधी दोन प्रमुख कथांचा उल्लेख आढळतो

१.रामायणातील कथा : रावणाचा वध करुन श्रीरामांनी सीतेची सुटका केली व अयोध्येत परतताना त्यांनी मिळवलेल्या विजयाचा उत्सव म्हणून हा दिवस साजरा केला जातो. येथे हा दिवस धर्म व सत्याचा अन्यायावर विजय दर्शवितो.

२. महिषासुरमर्दिनी कथा : देवी दुर्गेने नऊ दिवस चाललेल्या युद्धानंतर महिषासुर या दैत्याचा वध करून दशमीला विजय मिळवला. त्यामुळे हा दिवस शक्ती व पराक्रमाचा प्रतीक आहे.

३. सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व : घरोघरी वाड्यावर सापडणाऱ्या आपट्याची पानं (सोनं मानून) एकमेकांना देण्याची प्रथा आहे. यामागे संदेश असा की ‘‘समृद्धी सर्वांनी वाटून घ्यावी.’’शस्त्रपूजनाची परंपरा हाही विजयादशमीचा अविभाज्य भाग आहे. शस्त्र, साधने, वाहने, यंत्रे यांना नमस्कार करुन आपली रोजी रोटी देणाऱ्या साधनांचा सन्मान केला जातो. महाराष्ट्रात व विशेषतः ग्रामीण भागात सीमेवरचा उत्सव साजरा केला जातो, जिथे गावातील लोक एकत्र येऊन आपट्याची पानं देवतांना वाहतात आणि परस्परांना देतात.प्रेरणादायी संदेशविजयादशमी आपल्याला स्मरण करुन देते की जीवनात कितीही अडचणी, अन्याय, अंधार असला तरी सत्य, संयम व धैर्य यांच्यामुळे शेवटी विजय मिळतो.

समाजातल्या अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे, स्वतःचे आणि इतरांचे हक्क जपणे हीच खरी आजच्या काळातील रावणवधाची व्याख्या आहे. अंधश्रद्धा, भ्रष्टाचार, अन्याय, अज्ञान हीच खरी महिषासुरी शक्ती आहे; तर ज्ञान, प्रामाणिकपणा, विज्ञान व सद्गुण हीच खरी दुर्गाशक्ती आहे.आजच्या काळातील संदेशआजच्या आधुनिक युगात विजयादशमी साजरी करण्याचा अर्थ फक्त रावणाची प्रतिकात्मक होळी करणे इतकाच नाही, तर आपल्या आयुष्यातील वाईट सवयी, नकारात्मक विचार व अडथळे दूर करण्याचा संकल्प या दिवशी करावा.

तंत्रज्ञान, शिक्षण व विज्ञानाच्या मदतीने समाजाच्या विकासासाठी काम करणे हीच खरी शस्त्रपूजा आहे.

कुटुंब, समाज व राष्ट्र एकत्र येऊन प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणे हा या दिवसाचा खरा संदेश आहे.

निष्कर्ष : विजयादशमी हा केवळ धार्मिक सण नाही, तर सद्गुणांचा सन्मान, न्यायासाठी संघर्ष आणि एकतेचा उत्सव आहे. तो आपल्याला जीवनातील प्रत्येक क्षेत्रात  व्यक्तिगत, सामाजिक किंवा राष्ट्रीय  सतत नव्या जोमाने, नव्या उमेदीनं पुढे जाण्याची प्रेरणा देतो. म्हणूनच प्रत्येकाने हा दिवस केवळ परंपरेनेच नव्हे तर विचारांनी, कृतींनी आणि संकल्पांनी साजरा करणे आवश्यक आहे

## Register For






# Rotary Mid Town this Week Photo Gallery










LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

STAR Health Insurance
Personal & Caring
The Health Insurance Specialist

**Shradhhanand Apshetti**
(Insurance Advisor)

Child Education

Family Protection









Child Marriage

Retirement Plan



9623666693

apshetti.lic@gmail.com